## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,सांगली

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या स्थरावरील केंद्र शासन पुरस्कृत स्वायत्त संस्थेमार्फत मुख्यत्वे करून केंद्र शासनाने ग्रामीण विकासाबरोबरच दारिद्रय निर्मुलनासाठी विविध रोजगार आणि स्वयंरोजगार निर्मितीचे कार्यक्रम राबिवले जातात.यामध्ये स्वर्णजयंती गरम स्वरोजगार योजना ,इंदिरा आवास योजना इ.महत्वाच्या योजनाचा अंतभार्व होतो.केंद्र शासनाबरोबरच राज्य शासनाकडूनही या योजणासाठी  ठरविक प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जातो.जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सांगली मार्फत खालील (अ.न.१ते३)योजना राबिवणेत येत आहेत.

## राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नत्ती अभियान

## महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नत्ती अभियान

❖ योजनेचे स्वरूप :-

- राष्ट्रीय राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नत्ती अभियान हे अभियान केंद्र पुरस्कृत अभियान असून सन २०११ पासून सुरु करणेत आले आहे.महाराष्ट्र राज्यात  महाराष्ट्र राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नत्ती अभियान  म्हणून अंमलबजावणी करणेत येत आहे.
- केंद्र शासनाकडून ७५% व राज्य शासनाकडून २५% या प्रमाणात निधी उपलब्ध केला जातो.
- यापैकी ५०% अनुसूचित जाती,४०% महिला,१५%अल्पसंख्याक,३% अपंग यांचेसाठी खर्च केला जातो.

- एकूण उपलब्ध निधीचा २५% अनुदानासाठी ,२०% मुलभूत सुविधेसाठी ३०% प्रशिक्षण व २०% खेळते भांडवल व ५%प्रशासन या बाबीवर खर्च केला जातो.
- मुलभूत सुविधेतून निवडलेल्या अक्टीव्हीठी क्लस्टरचा जिल्हाच्या एकत्रित प्रस्ताव तयार करीत असताना या क्लस्टरमध्ये आवश्यक असणारे मुलभूत सुविधांचे समावेश करून त्या बाबीसाठी खर्च करावा.

❖ अभियानाचा उद्देश:-

- सन एप्रिल १९९९ मध्ये सुरु झालेल्या स्वर्न्जायन्ति गरम स्वरोजगार योजनेचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नत्ती अभियानात सन २०११ मध्ये झाले असून राज्यातील सर्व गरीब कुटुंबपर्यंत पोहचून त्यांना कायमस्वरूपी उपजीविकेच्या संधी उपलब्ध करने व  गरिबांच्या बाहेर येईपर्यंत त्यांना मदतीचा हात देवून त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे हा या अभिनयाचा उद्देश आहे.

❖ लाबार्थीच्या पात्रतेचा निकष:-

- या योजनेतून अनुदानाचा लाभ घेनेसाठी ग्रामीण भागातील शासनाचे सर्व्हेक्षण करून तयार झालेल्या दारिद्रय रेषा यादीत नाव असणे आवश्यक
- अशा दारिद्रय रेषेखालील १० ते २० महिला,महिला व पुरुष यांच्या गटाला व्यवसायासाठी लाभ दिला जातो.
- बचत गटातील ७०% सदस्य दारिद्र रेषेखालील यादीत नाव असणे आवश्यक आहे.
- अनुसूचित जातीच्या स्वरोजगारीस रु.२००००/- व इतर स्वरोजगारीस रु.१५०००/-अनुदान विविध व्यवसायास देय आहे.

# इंदिरा आवास योजना

योजनेची वैशिष्ठे :

उद्देश :

- दारिद्र रेषेखालील बेघर लोकांना निवारा उपलब्ध करून देणे.
- उदिष्ठांचे ६०%अनु.जाती/जमातीसाठी राखीव व ४०% इतर लाभार्थी
- घरकुल /घर दुरीस्तीमध्ये शौचालय ,निर्धुर चुली बसविणे आवशक्य.

योजनेचे तपशील :

- लाभार्थी दारिद्र रेषेखालील कुटुंबातील असावा.
- लाभार्थी निवड ग्रामसभेमार्फत असावा
- लाभार्थी बेघर असावा
- यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा
- नैसर्गिक आपत्ती ,विधवा ,अपंग,परितक्त्या,घटस्पोटीत,माझी सैनिक व युद्धात वीरगती प्राप्त झालेल्यांचा कुटुंबाची प्राधान्य क्रमाने निवीड

❖ अनुदान व फायदे

- रु.९५,०००/- नवीन घरकुलाच्या बांधकामसाठी अनुदान +रु ५०००/- लाभार्थी स्वहिस्सा/श्रमदान स्वरुपात
- एकूण घरकुलाची किमंत रु.95,००० /-